# <u>डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर -१०</u>



<u>डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर -१०</u>

<u>नोटीस</u>

<u>सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन</u>

महाविद्यालयातील अर्थशास्त्र,इतिहास,राज्यशास्त्र व पाली-प्राकृत विभागातर्फे दि. ८/८/२०१९ ला सकाळी १०:३० वाजता खोली क्र.१ मध्ये बी.ए. च्या सर्व विद्यार्थानकरिता सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. करिता सर्वांनी हजर राहावे.

मार्गदर्शक - डॉ. विकास जांभूळकर , सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

दि. २/८/२०१९

प्राचार्य

PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLLEGE
NAGPUR

उपक्रमाचे नावं :- '**सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन**'

सहभागी विद्यार्थी- ४०

सहभागी विद्यार्थिनी – २५

उपक्रमाचे आयोजक – **अर्थशास्त्र,इतिहास,राज्यशास्त्र व पाली-प्राकृत विभाग**

प्रमुख वक्ता – **प्रा.डॉ. विकास जांभूळकर,**
**सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग,**
**रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर**

# <u>अहवाल</u>

**महाविद्यालयातील अर्थशास्त्र,इतिहास,राज्यशास्त्र व पाली-प्राकृत विभागातर्फे दि. ८/८/२०१९ ला बी.ए. च्या सर्व विद्यार्थीनकरिता सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाकरिता मुख्य मार्गदर्शक प्रा.डॉ. विकास जांभूळकर , सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर उपस्थित होते. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या उद्घाटन यांप्रसंगी बोलताना डॉ. विकास जांभूळकर यांनी कला शाखेत प्रवेश घेतल्याबद्दल प्रथम अभिनंदन केले व म्हणाले की सामाजिक , राजकीय, नैसर्गिक तत्वज्ञानाची मांडणी तथागत बुद्धांनी केली आहे. मानवी वर्तनाचा अभ्यास सामाजिक शास्त्रांमध्ये केला जातो. सामाजिक शास्त्र हे सजीवांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानवी जीवनाचे व्यवस्थापन, व संघटन सामाजिकशास्त्रे करीत असतात.तेव्हा कोणत्याही नैसर्गिक शास्त्रांपेक्षा सामाजिक शास्त्रांचे महत्व नाकारता येणार नाही.स्पर्धा परीक्षेविषयी मार्गदर्शन करताना म्हणाले की, खाजगीकरणामुळे ग्रुप डी, व सी च्या नोक-या संपल्या आहेत.ग्रुप ए व बी च्या नोक-या घेण्यासाठी विध्यार्थ्यानी प्रयत्न करावे. स्पर्धा परीक्षेची सुरवात मानसिकतेतून होत असते. तुम्ही तुमच्या पुस्तकासोबत किती वेळ बसू शकता,तुमच्या अभ्यासामध्ये किती सातत्य आहे यावर तुमचे यश निर्भर आहे.** MPSC **व** UPSC **सारख्या परिक्षा ह्या जिद्द व चिकाटी वर अवलंबून आहे. स्पर्धा परीक्षेसोबतच स्वयं रोजगार क्षेत्राचे स्वागत देखील आपण केले पाहिजे. जीवनाचा उद्देश केवळ नोकरी घेणे इतकाच सीमित न राहता तो व्यापक असावा. आपापल्या आवडीनुसार विविध कलागुणांना जोपासणे देखील गरजेचे आहे. याद्दष्टीने बी.ए.च्या अभ्यासाला महत्व देणे गरजेचे आहे. असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी असलेले डॉ, अविनाश फुलझेले इतिहास विभागप्रमुख म्हणाले की,स्पर्धा परिक्षा जिद्द,चिकाटी व नियोजनाच्या बळावर जिंकता येतात.विषयाची निवड व त्याचा शिस्तबद्ध अभ्यास करणे महत्वाचे आहे,** कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. विद्या चौरपगार राज्यशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. सरोज भालाधरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक बहुसंखेने उपस्थित होते.


डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दीक्षाभूमी, नागपूर
सामाजिक शास्त्रे अध्ययन मंडळ
अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र,
पाली प्राकृत विभाग
Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-08-08(Thu) 10:48
25°C
77°F


डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दीक्षाभूमी, नागपूर
सामाजिक शास्त्रे अध्ययन मंडळ
अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र,
पाली प्राकृत विभाग
Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-08-08(Thu) 10:52
25°C
77°F


Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2019-08-08(Thu) 10:52
25°C
77°F